REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018


# हिंदूत्ववादाचे भारतीय समाजावरील परिणाम

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना

खेडयापाडयातून विखूरलेल्या भारतीय समाजाला एकाच प्रशासकीय यंत्रणेच्या प्रभावाखाली आणून भारतीय सामान्य जनतेला मताधिकाराद्वारे शासकीय यंत्रणेत सहभागी होण्याची त्यांच्या इच्छेनुसार सरकार निर्माण करण्याची संधी दिली. भारतीय जनतेला हा सर्वाधिकार भारतीय घटनेने बहाल करुन लोकशाही तत्वाची श्रेष्ठत्व मान्य केले. वस्तुत: राजकीय सामाजिक त्याद्वारे धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे उद्दिष्ठ साध्य करण्याचा प्रयत्न सर्वच राजकीय पक्षाकडून आणि शासकीय यंत्रणेकडून व स्वयंसेवी संस्थाकडून होणे अपरिहार्य होते. परंतु स्वातंत्र्यपुर्व काळापासून स्वत:चे वेगळेपण जपण्याचा हेतूने भारतातील हिंदुत्ववादीअहंता बाळगणारा व इस्लामिक गटाकडून वांरवार लोकशाही मुल्याना आव्हान दिले गेले आहे. ज्या वर्ग विरहीत, शोषणमुक्त, धर्मनिरपेक्ष राज्याचे व समाजाचे घटनाकरांनी ध्येय अपेक्षिले होते त्या ध्येयाला विशेषत: १९८० च्या दशकानंतर मोठे आव्हान दिले गेले. धर्म आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधाविषयीची साशंकताही पुर्वापार अस्तित्वात होतीच. मुस्लीम लिगने धर्माच्या आधारावर स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली होती आणि तीला मुस्लीमांमधील एका मोठया गटाने पाठींबा दिला. या पार्श्वभूमीवर धर्माचे राजकारण हा अनेकांच्या चिंतेचा विषय होता व आजही आहे. स्वातंत्र्यपुर्व काळांत आणि स्वातंत्रोत्तर काळांतही हिंदू मुस्लीम दंगे झाले. अलीकडील काळात धार्मिक दंगलीनी व्याप्ती वाढली. जी जातीय दंगल शहरापर्यंत मर्यादीत होती ती ग्रामीण भागांतही विस्तारली. फाळणीच्या वेळी अन्य धर्मीयांवर हिसंक हल्ले करुन आपला धर्माभिमान सिध्द करण्याचा प्रयत्न धार्मिक समूहांनी केलेला होत. स्वतंत्र भारतात हिंदू मुस्लीम ऐक्याबाबत आजही व्यासपिठांवरुन चर्चा होत असल्याचे दिसते. या अनुषंगाने धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष भारतीय समाजाचा विचार होणे अपरिहार्य वाटते.

१९८० च्या नंतर भारतीय राजकारणात धार्मिकतेचे आणि जमातवादाचे रंग भरले जाऊ लागले. ८० च्या दशकांच्या मध्यावर राम जन्मभुमी आंदोलन सुरु झाले. अल्पकाळातच तो राजकारणातील मध्यवर्ती मुद्दा बनला. त्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी दंगली उसळल्या. राम जन्मभुमी आंदोलनाची परिणती म्हणून ६ डिसेंबर १९९९ ला संसद, सरकार आणि न्यायालय या संस्थाना डावलून झुंडशाहीच्या मार्गाने वादग्रस्त मशिदीची तोड-फोड करण्यात आली. या घटनेचा राजकीय लाभ भाजपा ने उठविला. ९० च्या दशकात भाजपा हा हिंदू हितकर्ता पक्ष म्हणून भराभराटीला आला. भाजपाच्या या हिंदूत्ववादी चौखूर उधळलेला अश्र्वाला आवर कसा घालायचा या प्रश्नाने चिंतीत होऊन भाजपा विरोधकांनी जमातवादी सत्तेविरुध्द सेक्युलर शक्तीच्या एकजुटीवर आपल्या अशा केंद्रीत केल्या. भारतीय राजकारणात जमातवादी आणि सेक्युलर या संकल्पना मध्यवर्ती ठरल्या. प्रामुख्याने भारतीय राजकारणाचे स्वरुप धर्माच्या राजकारणाच्या रंगाने गढूळ झाले. १९९० नंतर भारतीय राजकारणंत जो राजकीय गदारोळ निर्माण झाला त्यात सेक्युलर व जमातवादी संकल्पनाचे अर्थ बदलले व शिवाय राजकारणातील विविध राजकीय पक्षांच्या भूमिकांचे संदर्भ बदलले. राजकीय पक्ष संघटना त्या पक्षाची वैचारिक बैठक व विचार परंपरा या नुसार राजकीय पक्षाची ओळख होत असते. राजकीय पक्ष संघटनेकडून स्विकारल्या गेलेल्या विचारपंरपरे नुसारच त्या राजकीय पक्षाची प्रतिमा तयार होत असते. परंतु ८० च्या दशकानंतर भारतीय राजकारणात सत्तेसाठी राजकारण आणि राजकारणासाठी धर्मकारण असा जो प्रवाह निर्माण झाला त्याचे पडसाद भारतीय राजकारणावर होणे अपरिहार्य होते.



### भारतीय राजकारणांत व समाज जीवनांत अवतरलेला जमातवाद -

भारतातील जमातवाद हा भारताच्या राजकीय अस्तित्वाचे व भारतीयत्वाला आव्हान ठरू पाहात आहे. भारतीय सामाजिक जीवन हे जरी बहूपट्टी, बहूआयामी, विविध रंगाचे, पैलूचे जरी असले लरती त्यामध्ये सातत्याने एकत्व आढळले. हे भारतीय समाज जीवनाचे वैशिष्ट आहे. भारतीय सामजाला आधुनिक जीवन पध्दतीची ओळख करुन देऊन एक नवसमाज निर्माण करण्याच्या उद्देशाने भारतीय राज्यघटनांकारांनी घटनेच्या उद्देश पत्रीकेत शाश्वत मुल्यांची मांडणी केली. कोणत्याही समाज व्यवस्थेत विविध विचार सरणी बाळगणारे वेगवेगळे व्यक्तीसमूह असतात. काहीं प्रतिगामी असतात तर काही पुरोगामी. धार्मिक जीवनाबाबत काही मुलतत्ववादी असतात तर काही सुधारणावादी असतात. धर्माचा उदो उदो करणारी आणि धर्माचे महत्व प्रतिपादन करणारी मंडळी वास्तविक पाहात स्वतःचे हितसंबंध सुरक्षीत ठेवण्याचे राजकारण करीत असते. अलीकडील काळांत सर्वानाच धार्मिक मुलतत्ववाद वाढीस लागल्याचे दिसते. धार्मिक मुलतत्ववाद याचा अर्थ विशिष्ठ धर्माची कांही पवित्र, अपरिवर्तनीय आणि कायमस्वरुपी मुलतत्वे असतात असे मानून सदासर्वकाळ सर्वांनी ही तत्वे आचार विचारांत पाळली पाहिजेत. असा आग्रह धरणे होय. या आग्रहापोटी प्रसंगी अनुयायावर सक्ती आणि विरोधकांवर हल्ला केला जातो. सर्वच धर्मातले काही गट अशा मुलतत्ववादी विचाराचे असतात. त्यामुळे कोणा एकाच धर्मातले सर्व अनुयायी मुलतत्ववादी असतात हे म्हणणे व समजूत चुकीची आहे. इस्लामी मुलतत्वावादी आहेत असा वैचारिक कांगावा संघ आणि भाजपा ने सातत्याने केलेला आहे. परंतु ज्यु, ख्रिश्चन, शिख तसेच स्वतःला हिंदू म्हणून घेणारे हिदू मध्येपण मुलतत्ववादी दाखविता येतात. धार्मिक श्रेष्ठत्वाचे अहंतेमधूनच मुलतत्ववाद वाढीस लागत आसतो. काही व्यक्ती व व्यक्तीसमूह स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी मुलतत्ववाद जोपासण्याचा तो वाढविण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असतात. भारतीय सामाजिक जीवनातील विविध धर्माच्या धर्म मार्तडाकडून सातत्याने मुलतत्व विकसीत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

मुलतत्वावादाची संबंधीत असतात आणि सामाजिक ऐक्याला छेद देण्यात मुळतत्ववादासी संबंधीत असणारा दुसरा घटक जमातवाद आहे. दिर्घकाळापासून भारतीय सामाजिक जिवनाला जडलेला हा रोग असून भारतीय उपखंडात सार्वत्रिक त्याचा संचार होऊ लागलेला आहे. विशेषतः रामजन्मभूमी आंदोलनानंतर त्याचे सर्वव्यापी विध्वंसक रुप भारतीय समाज अनुभवत आहे. धार्मिक जमातवाद लोकशाही जीवनमुल्याना प्रतिरोध करणारा विचार आहे. एकाच धर्माच्या सर्व लोकांमध्ये त्या धर्माच्या आधारे आत्मभान निर्माण करणे. हे धार्मिक जमातवादाचे प्रमुख लक्ष्य आहे. धर्माच्या अधारे लोकांमध्ये आत्मभान निर्माण करुन त्याचे राजकीय शक्तीमध्ये रुपांतर करणे हे जमातवादी विचाराचे उद्दिष्ठ आहे. असे आत्मभान निर्माण करण्यासाठी स्वतःच्या धर्माविषयी अवास्तव अहंकार लोकांच्या मनात निर्माण केला जातो. त्याला पुरक म्हणून इतर धर्म आणि धर्माच्या बद्दल संशय, तुच्छभाव द्वेष पसरविला जातो. इतर धर्माचे लोकहे आपल्या धर्माला धोकादायक आहेत अशी जाणीव लोकांच्यात घडविली जाते. या पार्श्वभूमीवर आपले धार्मिक आणि भौतिक हित संभाळण्याकरीता हिसेंच्या वापराला उत्तेजन दिले जाते, किंवा हिंसेच्या वापराचे समर्थन केले जाते. दोन भिन्न धर्मीय समूहातील संबंधावर उपाय म्हणून असहिष्णुता आणि सामूहिक हिंसेच्या वापरावर भर दिला जातो. या मधून धार्मिक दंगली घडतात. सर्व सामाजिक ताणव, भौतिक संघर्ष आणि अंतविरोध यांचे सांप्रदायिक विभाजनाच्या तत्वानुसार स्पष्टीकरण करुन आपल्या समाजाला स्थितीला विशिष्ठ अन्य धर्मीय जबाबदार आहेत असा दावा केला जातो. सामूदायिक पातळीवर एखाद्या धर्माच्या लोकांमध्ये जमातवादी भावना निर्माण करण्यासाठी पंरपरा आणि धार्मिक प्रत्रिके यांचा कौशल्यपूर्ण वापर केला जातो. जमातवादामध्ये लोकभावना प्रक्षुब्ध करण्याची ताकद असते. त्यामुळे स्पर्धात्मक लोकशाहीच्या चौकटीत लोकांना कृतीप्रवण करण्यासाठी जमातवादाचा उपयोग केला जाऊ शकतो. राजकीय पातळीवर भावनिक जनाधार निर्माण करुन सत्ता काबीज करण्यासाठी जमातवादाचा वापर केला जाऊ शकतो.

भारतीय राजकारणात धर्म निरपेक्षतेच्या तत्वास अग्रगण्यता देण्याचा प्रयत्न प्रथम पासून होऊनही भारतीय राजकारण जमातवादी राजकारणामुळे तळागाळापासून ढवळून निघालेले आहे. विशेषतः बाबरीच्या पाडावानंतर भिन्न धर्मियांच्या आणि पंथीयाच्या अस्तित्वास आव्हान निर्माण केले. जमातवाद केवळ राजकीय सत्ता प्राप्तीचे साधन नाही. सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर जनतेमध्ये स्थितीकारी किंवा प्रतिगामी जाणीव निर्माण करणारी ती विवाहप्रणाली आहे. जमातवाद आणि धार्मिकता यांत फरक आहे. धर्मयुध्द आणि जमातवाद या दोन भिन्न प्रणाली आहेत. जमातवाद ही सांस्कृतिक वर्चस्व स्थापू बघणाऱ्या संघटनाची राजकीय ताकद मिळविण्यासाठीची एक व्युहरचना आहे. अशा जमातवादी संघटनेत धर्मांधता एक जमातवादी किंवा जातीयवादी गट असू शकतो. त्यांचा जमातवादी विचारव्युहावर विश्वास असतो आणि म्हणूनच ते इतर धर्मियांकडे जमातदवादी दृष्टीकोनातून पहात असतात. जमातवादाचे अपेक्षित ध्येय सत्ता प्राप्तीचे असते तसेच त्यांना राज्यसंस्थेवर स्वतःच्या विचारांचे वर्चस्व स्थापन करण्याचे असते. समाजांत जमातवादी विचारांचे आरोपण करुन विशिष्ठ धर्माच्या लोकांचे वेगळेपण कायम टिकविण्याचा प्रयत्न जमातवाद्याकडून होत असतो. औपचारिक

पातळीवर समता, स्वातंत्र्य, कायद्यापुढे समानता, धर्मस्वातंत्र्य यांना त्यांचा विरोध नसतो. पात्यार्थिक आणि धार्मिक व अध्यात्मिक समाधान राज्यसत्ता विशिष्ठ धर्माचीच असावी असाही त्यांचा आग्रह नसतो. निव्वळ सत्तेसाठी म्हणजेच राजकीय सत्तेसाठी जमातवाद हे एक साधन व मात्रा असतो. कांही जमातवादी गट मात्र स्वत:ला संस्कृती, सरंक्षक मानतात. समाजातील चांगल्या वाईटाची निवड, मुल्ये आणि मानदंडाची जडणघडण या वर वरचष्मा राखून सामान्य जनाचे कायम स्वरुपी सांस्कृतिक रखवालदार म्हणून हे काम करीत असतात. धार्मिक समूहाचे बंदिस्त, आत्ममग्न आणि अन्य संशयी बेटात रुपांतर करुन त्या बेटाभोवती परकेपणा, संघर्ष संशय आणि स्पर्धेचे समुद्र निर्माण करण्याची सांस्कृतिक जबाबदारी अशा रखवालदारांनी घेतलेली आते. कोणत्याही धर्मामधील जमातवादी गट आपल्या पुर्वजांच्या पोशाखाी, जगण्याच्या पध्दतीचे अनुकरण करुन समाजमनावर धार्मिक प्रभाव निर्माण करीत असतो.

भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष राज्य ही भारतीय राज्यघटनेची वैशिष्ठे आहेत त्यानुसार भारतीय जनजीवनाची व समाजमनाची जडण घडण व्हावी ही अपेक्षा आहे. जरी भारतीय समाज विविध धर्म, जाती, वर्ग, पंथ, संप्रदाय इ. नी व्याप्त असला तरी भारतीय समाजाचे एकूण रुप एकत्वाच्या चीवट धाग्यानी एकत्रीत गठीत झाल्याचे जाणवते.

भारतीय समाजातील विविध लोकसमूह जीवन जगण्यासाठीची स्वतंत्र जीवनमुल्ये, देव देवता, सांस्कृतिक रितीरिवाज, धर्मासंबंधीच्या कल्पना स्विकारुन दुसऱ्याच्या धार्मिक क्षेत्रांत कसलीही ढवळाढवळ व हस्तक्षेप न करता, जीवन जगत असल्याचे दिसते. परंतु ऐंशीच्या दशकानंतर देशांत भगवे वारे वाहू लागले. त्याच्या भारतीय जनजीवनावर दिर्घ परिणाम होत असल्याचे, झाल्याचे दिसते.

जमातवादाची व्याप्ती विचारांत घेतल्यानंतर कांही मुस्लीम, शिख संघटना पण जमातवादी भूमिका घेत असल्याचे आपणास दिसते. परंतु त्यांच्या प्रभावाची व्याप्ती ही मर्यादित आहे. त्यंच्या कारवायांना संपुर्ण देशाच्या राजकारणाचा आणि समाज जीवनाला वळण देण्याची क्षमता नाही आहे. भाजपा आणि रा.स्व. संघ परिवारासारखी दिर्घकाळ जमातवादाची प्रसार करणारी संघटना. हिंदू समाज मनावर प्रभाव निर्माण करु शकत असल्याने त्यांचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक ठरते. १९५० नंतरच्या काळात संघाचा राजकीय क्षेत्रातील एक अवतार म्हणून जनसंघ अस्तित्वात आला. सांस्कृतिक राष्ट्रवाद, आक्रमक संरक्षण व परराष्ट्र धोरण, गोवध बंदी यासारख्या विषयाच्या धोरणात्मक चौकटीत जनसंघ स्वत:चे अस्तित्व टिकवून होता. अल्पसंख्याकांचा वेगळया, स्वतंत्र सवलती नसाव्यात, काश्मिरसाठीची स्वतंत्र तरतूद काढून टाकावी अशा मागण्या जनसंघाकडून होत असत. जनसंघाच्या राजकीय अविष्कार मर्यादीत स्वरुपात होता. नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले होते. फाळणीच्या जखमा ताज्या होत्या. भारतीय समाजाचे मन नवीन आकांक्षानी उत्तेजीत झालेले होते. एक नवे राष्ट्र, संपन्न, समृध्द, बलदंड राष्ट्र निर्माण करण्याची मनिषा बाळगून असलेला समाज तत्कालीन जनसंघ व इतर हिंदूत्वावादयाच्या जमातवादी विचारप्रणाली पासून अलिप्त राहिला.

१९८० नंतर देशातील राजकीय समीकरणे बदलली. रा. स्व. संघाला आणिबाणीच्या ऐतिहासकि पार्श्वभूमीवर एक वेगळी प्रतिमा लाभली. पुर्वाश्रमीचा जनसंघ नव्या भाजपा च्या अवतारात उभा राहिला. संघप्रणीत भाजपाने संसदीय राजकारणांत मध्यममार्गी भूमिका घ्यावी व देशाच्या राजकारणात मध्यवर्ती स्थन मिळवावे आणि दुसऱ्या बाजूला संघाने व संधपरिवाराने सास्कृतिक क्षेत्रात जम बसवावा. आणि या दोन्हीच्या एकत्र जोडणारा दुवा म्हणून कमी अधिक आक्रमक जमातवादी भूमिका घेत राहायची. अशा प्रकारे संघपरिवार आणि भाजप ची १९८० पासून वाटचाल चालू आहे. रामजन्मभूमी आंदोलनात भाजपाने प्रथम पासून जी पावले उचलली तर असे लक्षात येते की संघ आणि भाजपा सावकाशपणे, चतुराईने जमातवादी राजकारण घडवून आणत होते. धार्मिक आंदोलना शिवायच्या कालखंडात संघ ही एक सांस्कृतिक सघटना असते. आम्ही परधर्माचा द्वेष करण्यास शिकवत नाही. संघ म्हणतो भाजपा लोकशाहीवादी असल्याचे म्हणतो परंतु या दोन्ही संघटनाच्या कार्याचा आढावा घेतल्यास भारतातील एक पार मोठा जमातवाद गट स्वत:चे असली स्वरुप दडवून आपल्या जमातवादी कारवाया पार पाडीत असतो, हे लक्षात येते.

संघ परिवाराच्या कार्यावर एक नजर टाकली तर असे लक्षात येते की, संघाचे कार्यक्षेत्र, सामाजिक आहे. सामाजिक क्षेत्र म्हणजे राज्य संस्थेच्या कक्षेच्या बाहेरील सामाजिक व्यवहाराचे स्वायत: क्षेत्र. यात सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक संबंध, कृती वगैरेचा समावेश होतो. भारतात जमातवाद विचार मुख्यत: राजकारणाच्या संदर्भात केला जातो. त्या मागील सामाजिक पार्श्वभूमीकडे सहसा लक्ष दिले जात नाही. त्यामुळे संघाकडे पहाताना लोक आदराने पाहातात. संघाचे सांस्कृतिक कार्य वस्तुत: जमातवादाची निगडीत असून राजकीय सत्तेच्या जो सामाजिक आधार व वैचारिक आधार आवश्यक असतो तो निर्माण करण्याचे कार्य संघपरिवाराच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याद्वारे पार पाडले जाते. संघ ज्याला सामाजिक कार्य म्हणतो किंवा सांस्कृतिक कार्य म्हणतो तेच जमातवादी राजकारणामागील कळीचे कार्य आहे.

वस्तुतः समाज आणि राजकीय क्षेत्र यांच्यामध्ये संकल्पनात्मक फरक असतो हे जरी खरे असले तरी राजकीय क्षेत्राला मान्यता प्राप्त होण्यासाठी सामाजिक मान्यतेची गरज असते. राजकीय क्षेत्राला व सत्तेला जो पर्यंत सामाजिक अधिमान्यता मिळत नाही तो पर्यंत राजकीय क्षेत्र हे वैधता प्राप्त करु शकत नाही. म्हणून दोन्ही क्षेत्रात परस्पर घनिष्ठ संबंध आहेत. संघाचे विचार राजकीय स्वरुपाचे कार्य या संबंधाने किंवा अनुषंगाने फार महत्वाचे आहे. रामजन्मभूमी आंदोलना पुर्वी रथ यात्रा, कारसेवा, रामजन्मभुमी पुजन इ. सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे धार्मिक वातावरण निर्माण करण्याचे आणि त्या अनुषंगाने धार्मिक उन्माद व जमातवादी वातावरण निर्माण करण्याचे काम संघाने आणि भाजपाने पार पाडले होते. त्यामुळे भारतीय राजकारणात जमातवाद उग्र स्वरुपात वाढत राहिला.

## धर्म आणि राजकारण - परस्पर संबंध व त्याचा परिणाम :-

भारतातील राजकारणाचे स्वरुप विशेषतः १९८५ पासून बदलल्याचे दिसते. १९८५ नंतर कधी नव्हे ते धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात प्रश्न निर्माण केले गेले. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट न राहाता हिंदू राष्ट्र बनेल काय? असा प्रश्नार्थक विचार मांडला जाऊ लागला. भारतीय समाजाला आणि राजकारणाला धार्मिक परंपरापासून मुक्त करुन धर्मनिरपेक्षतेचा आशय देण्याचा हेतू उध्दवस्त होईल काय? अशी साशंकता निर्माण झाली.

धर्मनिरपेक्षतेचा विचार वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनांत विचारांत घेतल्यास पुढील अर्थ स्पष्ट होतो. व्यक्तीगत आणि सार्वजनिक क्षेत्रात सेक्युलर म्हणजे इहवादी वृत्ती बाळगणे अगदी मर्यादित अर्थाने धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांची फारकत. या स्थूल अर्थाने धर्मनिरपेक्षते संदर्भात विशेष प्रश्न निर्माण होत नाहीत. परंतु धर्माचा उपयोग राजकीय संघटन व राजकारणासाठीचे भावनीक अवाहन या दृष्टीने केल्यास राजकारणासाठीचे अवाहन देखील धर्मातीत किंवा धर्मनिरपेक्ष असावे असा होतो. धर्म, पंथ आणि संप्रदाय या बाबी खाजगी श्रध्देच्या असतात. त्या आधारावर समूहभान रचून त्या समूहाचा वतीने सत्ता मिळविण्याचे राजकारण करु नये. मुस्लीम लीग आणि भारतीय जनता पक्ष हे धर्म संप्रदायाच्या प्रतिनिधीत्वाचा दावा करतात व धार्मिक भावनाच्या अधारे राजकीय संघटन करु पहातात. धर्म ही केवळ व्यक्तीगत बाब नसून सार्वजनिक क्षेत्रांत आपला परिचय देऊन एका समूहाचा भाग होण्यासाठीचा आधार आहे. भारतात धर्म आजही सार्वजनिक जीवनातून हद्दपार झालेला नाही. यामुळे धर्म आणि सार्वजनीक जीवन यांची सरमिसळ झ ालेली असून धर्माचा प्रभाव राजकारणावर पडल्याचे दिसते. भारतात आजही जातीयतेता, धर्मभावनेला आवाहन करुन राजकीय संघटन धडविल्याची प्रक्रिया घडत असल्याचे दिसते. धर्माच्या माध्यमामधून जमातवादी वृत्तीचा विकास घडविणे आणि जमातवादाच्या माध्यमाद्वारे सत्तेचा सोपान गाठणे सहज शक्य आहे. १९८५-९५ या दशकांत भाजपने केलेली वाटचाल पाहिल्यास सत्ता प्राप्ती हेच उद्दिष्ठ भाजपने बाळगले.

संघ आणि संघपरिवारातील सर्वच उपसंस्थाचे कार्य हिंदूत्वाचा विचार मांडणे आणि हिंदूत्वाच्या आधारे राजकीय व सामाजिक संघटन करणे असे आहे. धर्माच्या अधारे घडवून आणलेले संघटन हे इतर धर्मियापासून दूर जाते किंवा दहशतीचा वापर करुन इतर धर्मीयांचे मानसिक खच्चीकरण करणे अशा हेतून होते. त्यामुळे सामाजिक विघटनशक्ती बीजे समाजात रुजतात. सामाजिक विघटनाची प्रक्रिया अधिक रुदांवत गेली तर त्याची बाधा राष्ट्रीय एकात्मतेला होते. या सर्वच अनुभुती आपण भारतीयांनी स्वातंत्र्यपुर्व काळांत अनुभवलेला आहेत.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षांनी विशिष्ठ धर्माची पाठराखण करु नये असा जरी संकेत असला तरी भाजपा पक्ष, शिवसेना आदि राजकीय पक्षांनी उघडपणे हिंदूत्ववादी विचार मांडलेले आहेत. आपली भारतीय समाजरचना कशी असावी. याची मुल्यात्मक चौकट चिकाटीने पुढे रेटण्याचा व्यापक, दिर्घसुत्री अशा संघटनात्मक जाळयाचा भाजप एक घटक आहे. संघाला अभिप्रेत असणारा हिंदूत्ववाद, त्या अनुषंगाने त्यांनी वर्णिलेली वर्णाश्रम पध्दती आणि समाजरचना पुन्हा पुर्नजीवीत करण्याचा विचार व प्रयत्न संघ व भाजप बाळगून आहेत. गोळवळकर गुरुजीच्या विचाराचा पाठपुरावा करणे आणि त्यानुसार कृतीप्रवण होणे हे त्यांच्या राजकारणाचे गमक आहे.

आक्रमक राष्ट्रवाद, हिंसेचे गौरवीकरण, परंपराचे समर्थन, इतिहासाचे विपर्यास्त आकलन व लेखन मुस्लीम धर्मीयाविषयी दुरावा, सर्व सामाजिक प्रश्नाची जमातवादी मांडणी, भांडवलशाहीचे समर्थन, सामाजिक बहुविधतेविषयी संशय, एक छत्री सांस्कृतिक वर्चस्वाची संकल्पना, दलित व दरिद्री समाज घटकाविषयी श्रेष्ठत्वाच्या भूमिकेतून कृपावंत होण्याची भुमिका इ. वैशिष्ठ संघ आणि संघाची संलग्न संस्थाच्या विचारांत व कार्यात आढळतात. हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती केवळ संघ व संघपरिवारच सुरक्षित ठेऊ शकतो अशी अंहता त्यांच्याकडे आहे. याचा एकूण परिणाम धर्मकारण, समाजकारण, राजकारण यांच्या जडणघडणीत दिसून येतो. धर्माच्या आधारे भारतात हिंदूचे एकछत्रीकरण करण्याचा प्रयत्न संघ आणि भाजप करु पाहात आहे. संघ आणि भाजप सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करतो. हिंदी भाषिक पटटयातील वरिष्ठ हिंदू संस्कृतीचे अधिष्ठान अभिप्रेत आहे. संसदीय शासन पध्दती विषयी साशंकता निर्माण केली जात

आहे. संघ आणि भाजप हे केवळ राष्ट्र संकल्पनेची चौकट नव्हे तर राज्यघटनेची चौकट पण वादग्रस्त ठरवू पहात आहेत. आक्रमक हिंदूत्वाचा प्रचार करुनही भाजप व संघास म्हणावे तसे यश मिळालेले नाही. धर्म आणि राजकारण यांची संगत आणि भारतीय समाजाचे एकुण स्वरुप या अनुषंगाने विचार केल्यास निधर्मी राष्ट्रवादाची उभारणी करण्यासाठी लोकशाही मुल्यातच भारतीय जीवन पध्दतीत प्राधान्य द्यावे लागणार आहे.

### वाढते इस्लामी धर्मवेड -

हा एक जागतिक प्रश्न होऊ पहात आहे. अफगाणिस्तानामधील तालीबानी राजवट आणि तालीबान्यानी उभा केलेला जहाल सांस्कृतिक वाद, इराणमधील आयातुल्ला खोमेनी आणि खोमेनीने इराणमध्ये निर्माण केलेला धार्मिक जहालवाद व त्यात होरपळलेली आणि संपलेली पहेलवी यांची राजवट आणि त्यांनी निर्मिलेली आधुनिकता, जागतिक पातळीवरील विविध इस्लामिक संघटनानी घडवून आणलेले विध्वंसात्मक हल्ले, ११ सप्टेंबरचा अमेरिकेतील न्युयॉर्क शहरातील ट्वीन टॉवरवर केलेला हल्ला, मुंबईच्या कुलाबा भागातील हॉटेल ताजवर केलेला हला या सर्व बाबी इस्लामच्या धर्मवेडाचे स्परुप व भयानकता व्यक्त करतात.

अलिकडे भारतातील हिंदूच्या मनांत मुसलमांनाच्या विरोधांत ज्या तीव्र भावना मुळ धरीत आहेत त्याचे कारण मुस्लीम धर्मवेड जो जागतिक प्रश्न होऊ पहात आहे त्यात आहे. मुसलमानाच्या सुधारणाविरोधी वर्तनाचा परिणाम आता केवळ मुसलमानापुरतांच मर्यादित राहिलेला नसून त्याचे आघात हिंदूमधील सुधारणा आणि प्रबोधनाच्या चळवळीवर देखील होत आहेत. या मुस्लीम धर्मवेडाला प्रतिरोध करण्यासाठी म्हणून हिंदूच्या मध्ये सुध्दा धार्मिक मुलतत्व वाद जोपासण्याऱ्या संघटना जन्मास आलेल्या असून त्या प्रतिगामी स्वरूप धारण करीत आहेत. याचा परिणाम हिंदूमधील सुधारणावाद व आधुनिकता क्षीण होण्यास होत आहे. ज्या प्रमाणात मुस्लीम संघटीत होत आहेत त्याच्रपमाणात हिंदूचे संघटन वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. ज्या क्रमाणे मुस्लीम संघटीत होतील त्याच प्रमाणात हिंदूपण संघटीत होतील. धर्मवेडाच्या परिणाम हा स्थितीशीलतेत होत असतो. भारतातील समाजाला आधुनिकतेकडे नेण्यासाठी धर्मातीत जीवनपध्दती उपयुक्त ठरु शकेल.

### मुस्लीमांची धर्मांधता आणि जातीयता :-

स्वातंत्र्यपुर्व काळात मुस्लीमांनी आपले स्वतंत्र अस्तित्व सांभाळण्यासाठी राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात आपल्या आक्रमक वृत्तीत वाढ करुन ज्या कारवाया घडविल्या त्या आजही हिन्दुमनांत चीड निर्माण करणाऱ्या आहेत. मुस्लीम नेत्यानी आणि धर्मगुरुनी ज्या राजकीय हेतूसाठी व स्वतःचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी मुस्लीम समाजाला शक्य ते राष्ट्रीय प्रवाहापासून दूर ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केला त्याचा दिर्घकालीन परिणाम हिंदू मनावर होऊन मुस्लीम समाजासंबंधी कायमचा दूषीत दृष्टीकोन निर्माण होण्यात झालेला आहे. मुस्लीमांच्या आक्रमक वृत्तीत आणि गुंडप्रवृत्तीना मुस्लीम नेत्यानी स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी वापरले, त्याचा उगम मुस्लीम लीगच्या कराची येथील अधिवेशनातील बॅ. जीना आणि सर अब्दुला हरुन यांच्या भाषणात आहे, या दोन्ही नेत्यांनी भारतीय मुसलमानांची तुलना मुस्लीम जगतातील सुदेतनाशी केली आणि सुदेतन जर्मनानी झेकोस्लोव्हाकीयासी जो व्यवहार केला तसाच व्यवहार मुसलमानांनी हिंदूशी करावा असा उपदेश केला (स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वस्तुतः भारतीय मुस्लीम समाजाने त्यांच्या धार्मिक नेत्याच्या कारवायांना संघटीत प्रतिकार करणे हवे होते, परंतु तसा प्रयत्न न झाल्यामुळे मुठभर धर्मगुरु, आणि नेत्यांच्या विषयी भारतीय हिंदू समाजाची जी मानसिकता निर्माण झाली व विचार करण्याची प्रक्रिया घडली. ती थांबवता येणे अशक्य झाले. हिंदूत्वाचा विचार बळकट होण्यास ही परिस्थिती कारणीभूत आहे.

भारतीय मुसलमानांवर मध्ययुगीन मानसिकतेचा अधिक प्रभाव आहे. एकेकाळी आपण हा देश स्वसामर्थ्यावर जिंकलेला आहे. अशी एक अहंता त्यांच्याठायी होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि देशाची फाळणी झाल्यावर त्यांच्या मानसिकतेत झालेला बदल विचारांत घेणे अपरिहार्य आहे. त्यांच्यातील संख्यात्मकतेची न्युन्यात्मक जाणीव किंवा न्युनगंड आणि बहुसंख्या हिंदु वर्चस्व - वादाखाली जीवन व्यतीत करण्यासाठीची अपरिहार्यता असल्यामुळे भारतीय मुसलमान राजकारणात आणि सामाजिक जीवनांत सकारात्मक भूमिका घेऊ शकत नाही. १९५० नंतरच्या भारतीय राजकारणातील मुसलमानांचे वर्तन हे सत्ताधारी वर्ग व पक्षाशी अनुकुल राहिले आहे. मुसलमानाचे काही आर्थिक, समाजिक आणि शैक्षणिक प्रश्न असतात याची जाणीव धर्मक्षेत्रातील आणि राजकीय क्षेत्रातील नेतृत्वाला दिसत नाही. सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणेबाबत त्यांच्यात संघटीत आंदोलने किंवा चळवळी झालेल्या दिसत नाहीत. मुस्लीमांना संघटीत हिंदू जनसमुहापासून आपले स्वतःचे स्वतंत्र राजकीय आस्तित्व महत्वाचे वाटते. इस्लाम खतरे में है ची टांगती धार्मिक तलवार सर्व सामान्य मुसलमानांच्यावर असते. म्हणून ते हिंदूपेक्षा आधिक भयग्रस्त असतो आणि झुंडीत व गर्दीत ते अधिक आक्रमक असतो. इस्लामच्या धर्मवेडामुळे आणि धर्म वैशिष्ठयामुळे या संघटीत शक्तीला सामाजिक आणि आर्थिक परिवर्तने स्वतःच्या

धर्म समुदायात करुन घेता आली असली. हिंदु-मुस्लीम संवादही निर्माण करता येऊ शकता असता. परंतु या संघटीत शक्तीला Vote Bank मतपेटीत रुपांतरीत करण्यात सत्ताधारी वर्ग आणि पक्ष यशस्वी होत गेले. सर्वसाधारणपणे मुस्लीम राजकारण उर्दुभाषेचा आग्रह, मुस्लीम व्यक्तीगत कायद्याचे संरक्षण, मुस्लीम विश्व विद्यालयाचा स्वतंत्र दर्जा, जातीय दंगली आणि हिंदूपासून अलगत्व या मुद्याभोवती फिरत राहिले आहे. जातीय दंगलीचा प्रश्न सोडला तर मुस्लीमाने राजकारण सत्ताधारी वर्गाला उपयुक्त ठरलेले आहे. जातीय दंगलीत मुस्लीमांची बाजू घेतली की मुस्लीम समाज खुष होतो. आणि त्याला मतपेटीत परावर्तीत करणे सोपे जाते. भारतीय मुस्लीम समाजातील समाजाने आर्थिक दारिद्रय, अज्ञान, धर्मप्रती असणाऱ्या अंधश्रध्दा यामुळे या समाजाचे परिवर्तन अशक्य होऊन बसले आहे. हिंदु जनसमुहाप्रती असणारी त्यांची प्रतिक्रीया हीच त्यांच्या जमातवादास पोषक ठरलेली आहे. एकगठ्ठा मते टाकणारा समाज आणि त्यादृष्टीने त्यांना सातत्याने अज्ञानांत ठेवण्याची राजकीय चाल यालाच मुसलमानचे अनुनय असे म्हटले गेले.

### भारतीय समाज जीवनात अवतरलेला बहुसंख्याकवाद -

कोणत्याही कालखंडातील राजकारणाचा विचार,मुल्ये, जनमत, राजकीय परंपरा यांची एक चौकट असते. वस्तुतः त्या निर्धारित चौकटीमध्येच त्या त्या काळातले वाद आणि राजकीय स्पर्धा घडत असतात. प्रत्येक कालखंडातील राजकारणाचे स्वरुप आणि त्या राजकारणातील विविध पोताचे रंग भिन्न आढळतात. राजकीय व्यवस्थेतील मानवी समूह, विविध मानवी समूहाची मानसिकता आणि स्वभाव व त्याचे राजकीय व्यवस्थेप्रती असणारे भान या मधूनच त्या राजकीय व्यवस्थेची मानसिकता आकारास येत असते. समाजातील विचार, मुल्ये आणि जनमताची रचना यांच्या अधारे राजकारणाची भूमी साकारते.

भारतातील विविध धर्माचे धर्मकारण आणि समाजजीवन यांच्या परस्पर संबंधामधून साकारलेले राजकारण त्यामधून विकसीत झालेला बहूसंख्याकवाद, अल्पसंख्याकवाद आणि त्याचा समाजजीवनावर होत असलेला अनिष्ठ परिणाम तपशीलाने अभ्यासणे योगय ठरले. इ.स. २००४ मधील सार्वत्रिक निवडणूकीत भाजपाचा पराभव झाला हे जरी खरे असले तरी भाजपने स्वतःच्या हितासाठी घडवलेली जनमताची भूमी स्थिरावली, समाजमान्य झाली. भारतीय समाजातील उच्च स्वरावर जीवन जगणारा वर्ग आणि उच्च मध्यमवर्ग हा अधिक धार्मिक जीवनपध्दतीकडे आणि धार्मिक कर्मकांडाकडे झुकला. भारतीय सामाजिक जीवन क्षेत्र कोणत्या दृष्टीकोनानी साकारले आहे हे पाहाणे महत्वाचे आहे. १९८५ नंतर देशात सावकाशपणे बहूसंख्याकवाद विकसीत होत गेलेला आहे. हिंदू समाज बहूसंख्य असल्यामुळे इथल्या संस्कृतीवर चालीरीतीवर हिंदू छाप असणार आणि असायलाच हवी असा आग्रह हिंदू जमातवादी संघटनाकडून धरला जातो. लोकशाही म्हणजे सर्वच निर्णय बहूसंख्येच्या इच्छेनुसार होणे एवढाच मर्यादीत अर्थ मांडून, भारतात कोणत्याही बाबी हिंदू मनासारख्या होत नाहीत. अशी तक्रार हिंदू जमातवाद्यांकडून केली जाते. सरकारकडून नेहमीच मुस्लीम अनुनय केला जातो. ही एक कायमची तक्रार हिंदू जमातवाद्यांकडून केली जाते. जमातवादाचा हिंसाचार हा जसा एक पैलू आहे तसाच बहूसंख्याकवादाची पेरणी करुन सामाजिक विद्वेषाच्या विषाची जोपासना करणे हे दुसरे वैशिष्ठ आहे. हा बहूसंख्याकवाद लोकशाही मुल्यांना, लोकशाही जीवन पध्दतीला मारक असुन लोकशाही जीवनपध्दती व राजकीय पध्दती उध्वस्त करणारा आहे.

भारतीय समाजात आढळणारा बहूसंख्याकवाद सध्यातरी आक्रमक व परद्वेष करणारा नाही. बहूसंख्याकवाद हिंदु विरुध्द अल्पसंख्या मुस्लिम असा वाद व विभागणी स्थिरावल्यास गुंतागुंत निर्माण होऊ शकते. शहाबानो प्रकरण, हज यात्रेसाठी दिले जाणारे आर्थिक साहाय्य इ. मुद्दयाबाबत केला जाणारा प्रचार हा बहूसंख्याकवादाचाच परिणाम आहे. वस्तुतः मुस्लीमांबाबत स्विकारण्यात येत असलेली तथाकथित कॉंग्रेसचे धर्मनिरपेक्षतेचे धोरण हे मुस्लीमांचया धार्मिक वृत्तीला पोषकच ठरणारे आहे. शहाबानो प्रकरणाबाबत पंतप्रधान राजीव गांधीनी घेतलेली धोरणात्मक माघार मुस्लीम मुलतत्ववाद्यांना व त्यांच्या जमातवादी राजकारणाला प्रेरक ठरणारी ठरली. बहूसंख्याकवादी दृष्टीकोनामुळे इतर समूहाविषयी उदासिनता व अज्ञान निर्माण होते. शहाबानो प्रकरणाबाबत हिंदुची प्रतिक्रिया गोध्रा हत्याकांडाबाबत मौन या सर्व बाबी बहूसंख्याकवादाशी संबंधीत आहेत. सर्व समाज घटकांचे जीवन व बंधुभावाचे परस्पर संबंध हे लोकशाहीचे पायाभूत अंग आहे. बहूसंख्याकवादामुळे इतर अल्पसंख्य समुहाचे अस्तित्व चालवून घेतले जाते. परंतु त्यांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित होत नसतो. भारतातील परिस्थिती जवळपास अशीच आहे हे खेदाने नमुद करावे लागेल. अल्पसंख्या विरुध बहूसंख्य अशी द्वैताची मांडणी करुन हिंदू बहूसंख्याकवादाची उभारणी १९८५ नंतर करण्यात हिंदुत्ववाद्यांना यश आलेले आहे. हिंदु बहुसंख्याकवादाचे आकर्षण आज वाढल्याचे दिसते.

## धार्मिकतेचा अविष्कार -

१९८० नंतर धर्म ही एक वर्गवारी ठरली. वस्तुत: धर्म प्रत्येक व्यक्तीस परिचय प्राप्त करुन देतो. विशिष्ठ सामाजिक व्यवस्थेचा एक घटक म्हणून व्यक्तीची ओळख धर्मामुळे होते. सार्वजनिक जीवनातली सामूहिक अस्मिता आणि वैयक्तीक श्रध्दा यांच्यातील परस्पर सरमिसळीमुळे गल्लत निर्माण होते. अलीकडीत काळांत वाढलेले गणपती उत्सव, नवरात्र महोत्सव अशा सार्वजनिक धार्मिक कार्याचे स्वरुप केवळ धार्मिक उत्सव अशा स्वरुपाचे न राहता, सामान्यजनांना धार्मिकतेची नशा देणारे, साधन झाले आहे. सार्वजनिक सत्यनारायण, महाआरती, पुजापाठ याचें महत्व वाढलेले असुन समाजात एका विशिष्ठ बहूसंख्याक गटाचे संस्कृती प्रदर्शन आहे. आणि हे संस्कृती प्रदर्शन हिंदूत्ववादी राजकीय व्यक्तीकडून विचारपुर्वक घडवून आणले जात आहे. बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना यांनी मुंबईच्या रस्त्यावर उभी केलेले महाआरतीचे प्रयोजन किंवा मुस्लीम मुलतत्ववादी व जमातवाद्यांचे ध्वनीवर्धक क्षेपकाच्या साहाय्याने करत असलेले दैनंदिन प्रार्थनेचे प्रयोजन या सर्व घटना, क्रिया, प्रतिक्रियात्मक स्वरुपाच्या आहेत. त्याचा परिणाम परस्पर धर्म भावनाच्या अनादर करण्याचा मनस्थितीतला पोषक करणाऱ्या आहे. सर्व धर्म समभाव, सर्व धर्मियांचे सह अस्तित्व या मानवतावादी विचाराला छेद देणाऱ्या आहेत.

पुजा प्रार्थना करणे, धार्मिक स्थळामध्ये नियमीत जाणे, भजन, सत्संग, उपवास, व्रते करणे इ. कृती धार्मिकतेच्या संदर्भात येतात. धर्मश्रध्दा आणि धर्मिक वृत्ती ह्रया धार्मिकतेच्या संदर्भात येतात. बहूसंख्यावाद आणि अविष्कृत धार्मिकता या मुद्दाम विचारपुर्वक घडविलेल्या सामूहिक कृती असतात. सामूहिक धार्मिक कृत्ती तीचा प्रचार आणि समाजमनावर तीचा पडलेला अलगतेचा प्रभाव हा राज्यकारभाराच्या दृष्टीने महत्वाचा भाग आहे. अलीकडील भारतीय राजकारण, धार्मिकता, बहूसंख्यावाद आणि आक्रमक जमातवादाच्या त्रिकोणात सामावलेले आहे. भारतातील विविध धर्म, अल्पसंख्य समुदाय आणि लोकशाहीकडे पहाताना याच त्रिकोणी दृष्टीकोनातून पहात आहे. धर्मश्रघ्दा मानवी सद्भावाना वृध्दिंगत करण्याचे साधन होण्याऐवजी धार्मिक स्पर्धा करण्याचे एक विषारी हत्यार बनलेले आहे. रस्तोरस्ती धार्मिक स्थळे निर्माण होत आहेत. श्रध्दाळूची ती आश्रयस्थाने होतात. मुंबईत महाआरत्यांचा कार्यक्रम घणघणतो तर चेन्नईत विनायक चतुर्थी हा महत्वाचा धार्मिक दिवस होतो. धार्मिक विविधता ही राष्ट्रवादाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या उभारणीत अडथळा म्हणून उभी केली जाते आहे. धर्माचे एकछत्रीकरण करण्याचा मानस म्हणजे इतर धर्मियांच्या सहअस्तित्वाचा नाश. इतर अल्पसंख्याकांच्या धार्मिक अधिकाराला औपचारिक मान्यता देत त्यांना सांस्कृतिक दहशतवादाच्या रणगाडयाखाली भरडण्याची प्रक्रिया पण घडते आहे. सर्व माणसे सदासर्वकाळ जमातवादी नसतात. पण जेव्हा कसोटीचे क्षण निर्माण होतात तेव्हा धार्मिकतेच्या दृश्य कल्पना आणि बहूसंख्यावाद अलगदपणे सामान्यजनतेला जमातवादाच्या विळख्यात घेवून जातात. धार्मिकतेच्या दृश्य परिणाम मुस्लीम समाजामधील अरबी पोशाखाचे आकर्षण आणि मुस्लीम स्त्रीयाच्यात वाढत असलेली बुरखा पध्दती - स्त्रियाची होणारी गळचेपी आणि धार्मिकतेच्या नावांखाली त्यांचे होणारे शोषण (शारिरीक आणि मानसिक) या चिंतनीय बाबी आहेत. भारतीय राजकारणात जात (उच्च व मध्यम) आर्थिक स्तर, आणि राजकारण असे वेगळे समिकरण तयार होत आहे. त्यांच्या भारतीय जनमानसावर प्रभाव पडत असून भारतीय राजकारण वेगवेगळया पायवाटा तुडवत गतीमान होत आहे. अशा विचित्र त्रांगडयात भारतीय समाज, भारतीय लोकशाही अडकलेली आहे.

१९८० च्या उत्तरार्धात भारतीय राजकारणावर वरिष्ठ जाती वर्गाचे क्रमाने प्रस्थापित झालेले वर्चस्व आणि कामगारवर्ग, असंघटीत शेतकरी व शेतमजूर यांची क्रमाने क्षीण होत गेलेली शक्ती यामुळे भारतीय राजकारणाची प्रवासाची दिशा विपरीत मार्गाने होत चाललेली आहे. राजकारणाच्या गतीने सामान्य माणूससुध्दा संभ्रमीत झालेला आहे. या कालखंडातील धर्माधिष्ठीत राजकारभाराच्या लाटेबरोबर तो इच्छेविरुध्द प्रवाहाप्रतीत झालेला आहे. या संभ्रमावस्थेतून त्याला बाहेर काढण्यासाठी त्याना वास्तवतेची जाणीव करुन द्यावी लागेल. भारतीय समाजातील कनिष्ठ जाती, स्त्रीया व इतर जाती समूहाचे धर्माच्य नावे होणाऱ्या शोषणाबाबत त्याना जाणीव द्यावी लागेल या शोषणाच्या विरोधात त्यांना मानसिकदृष्टया उभे करावे लागेल. धर्माधिष्ठीत चळवळी सामान्य माणसाच्या शोषितपणाची जाणीव नष्ट करतात. शिवाय त्याची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता संपवितात. धर्मसंस्थेने खरे सामर्थ्य आणि तीचा विशेष हाच आहे. धर्मसंस्था सामान्य माणसाला सत्वहीन बनवितात. इतर सामान्याचे स्वत्व संपवून धर्म मात्र वेगाने तळपत असतो.

विशेषत: १९९३ नंतरचे राजकारण निर्णायक वळणावर आल्याचे दिसते आहे. राजकीय अराजक, केंद्रीय सत्तेची दुर्बलता खुल्या व उदारमतवादी अर्थव्यवस्थेतून निर्माण होत चाललेली स्पर्धा इ. कारणामुळे समाजातील सधन आणि सबळवर्ग आक्रमक होत चाललेले आहेत. त्याचा अपरिहार्य परिणाम समाजातील विविध गटामध्ये आंतरिक तीव्र स्पर्धा आणि परस्पराविषयी द्वेष सार्वत्रिक होण्यात होत आहे. अशा अराजक सदृश्य वातावरणात विशिष्ठ वंश अथवा धर्माच्या नावांने राष्ट्रवाद हा पुढे होत असतो. धार्मिक मुल्ल्यावर आधारित राष्ट्रवाद भौतिकवादी मुल्यावर आधारीत असणाऱ्या राष्ट्रवादाची पिछेहाट करीत असतो. सामाजिक बांधीलकी, सामाजिक न्याय, समानता, आर्थिक समतेच्या मुल्यावर आधारीत असलेली

धर्मनिरपेक्ष लोकशाहीची चेष्ठा करण्यावर भर दिला जातो. राजकीय नेतृत्वाला धर्ममार्तंड व धर्मगुरु कडून राजकीय सल्ला दिला जातो. केवळ धर्मच सर्व प्रश्नांची उकल करु शकेल असे जनमत तयार करण्यावर भर दिला जातो. धर्मराज्य स्थापन करणे हाच अराजकसदृष्य परिस्थितीवरचा एकमेव उपाय आहे असे प्रतिपादन केले जाते. म्हणून धर्माचार्याच्या हाती सत्तेची सुत्रे देणे योग्य असते असा विचार मांडला जातो. भारतीय राजकारणांत अशी अराजकदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. त्रिशुळधारी साधु, महंत इ. चा राजकीय आंदोलनातील सहभाग, शंकराचार्यांची राजकीय भाष्ये, इ मुळे भारतीय राजकारण धर्माच्या थेट प्रभावाखाली व छायेखाली आले होते. सर्वधर्मसमभाव, सर्व धर्मीयाचे सहअस्तित्व हा विचार मागे पडून, विविध धर्मियामधील वाढता परस्पर द्वेष, आणि परस्पराविरुध्द केल्या जाणाऱ्या हिंसक कारवाया, प्रार्थना स्थळावर व मंदीरावर बेछुट गोळीबार, बॉम्बस्फोट हे नित्याचेच झालेले होते. या बिघडलेल्या राजकीय परिस्थितीचे कारण राजकीय पक्ष आणि राजकारणावर आहे. राजकीय नेते असतात परंतू राजकीय नेत्याऐवजी धर्माचार्याकडे देशाचे नेतृत्व सोपवावे अशी मागणी होत असते. भारतीय राजकारणाची भवितव्याची हिच शोकांतिका आहे. या संदर्भात भाजपच्या भावी राजकारण्याची दिशा समजून घेण्यासाठी दिनांक ७ व ८ एप्रिल १९८४ ला विज्ञान भवन दिल्ली येथे धर्मसंसंदेचे जे अधिवेशन भरले आणि धर्मसंसंदेने हिन्दुसाठी जी एक आचार संहिला मांडली तिचे स्वरुप समजून घेणे इष्ठ ठरेल. विश्व हिंदू परिषदेने हे ठराव प्रकाशीत केले आहेत. या ठरावांत इंद्रमोहन लाल धर्माचार्याना उद्देशून म्हणतात, भारतात सर्व क्षेत्रात सदैव धर्माचार्याचीच सत्ता होती परंतु आज दुर्देवाने सुत्रबध्द, संघटीत प्रयत्नाच्या अभावी समाजाचे नेतृत्व राजकीय नेत्याच्या हाती गेले आहे. सर्व राजकीय पक्ष सत्ता लोलूपता आणि शुद्र राजकीय लाभासाठी मुस्लीमाचा तथाकथीत अल्पसंख्याकाचा आत्मघाती अनुनय करण्यात मग्न आहेत. धर्मनिरपेक्षतच्या नावाखाली हिंदू हिताची उपेक्षा करीत आहेत. म्हणून आता धर्माचार्यानी संघटीत सुत्रदार प्रयत्नांच्या सात्विक तेजोबळाने समाजाचे नेतृत्व आपल्या हाती घेण्याची वेळ आलेली आहे. त्याच प्रमाणे संपुर्ण समाज आणि सत्ताकांक्षी राजनितीज्ञा नाही आचार संहितेत बांधून त्यांचे नियमन करत त्यांना धर्म मार्गावर आरुढ करावे. या परिक्षेच्या काळात राष्ट्र आपल्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत आहे.

धर्मसंसदेचा वरील ठराव आणि त्यामधील आशय भारतीय समाजाला व धर्मनिरपेक्षवाद्यांना अंतर्मुख होऊन विचार करण्यास प्रवृत्त करणारा आहे. धर्मसंसदेला अभिप्रेत असणारे अध्यात्मिक राजकारण कसे असेल? राजकीय सत्तेवर धर्माचा अंकुश निर्धारित करुन थेट शासन धर्माचार्याच्या नियंत्रणाखाली आणून शासन व प्रशासन विशिष्ठ धर्माचे साधन म्हणून वापरण्याचा निर्णय व कार्यक्रम या ठरावातून स्पष्ट होतो. धर्म संसदेच्या आचार संहितेच्या प्रकाशात १९८४ नंतरचा घटनाक्रम पाहिला तर विश्व हिंदू परिषद आणि धर्मसंसद हिंदू धर्माला संघटीत धर्माचे रुप Organised Religion कसे देऊ पहात आहेत हे दिसून येते. अध्यात्मिक राजकारण कोणत्या दिशेने प्रवास करीत आहे हे स्पष्ट होईल. धर्मसंसदेची वरील आचार संहिता ही हिंदुत्ववादी राजकीय पक्षाची मार्गदर्शन तत्वे आहेत. हिंदूत्ववादी राजकीय पक्षांना व संघटनाना त्याचा त्याग करता येणार नाही. धर्म संसदेच्या आचार संहितेचे प्रथम सुत्र हिंदू समाजाला एका सुत्रात बांधण्यासंबंधीचा तपशील देते. देवोस्थान एकादशीपासून गीता जयंतीपर्यतचा संपुर्ण एक महिना एकात्मता मास म्हणून पाळावा. प्रत्येक गावात गंगामाता आणि भारतमातेची शोभायात्रा काढून त्यांनी सामुदायिक पुजा करावी. सर्व वस्त्या अगदी गावात मंदीरे उभा करावीत. सर्वत्र एकात्मता मंत्राचे सामुहिक उच्चारण करावे, संत, महात्मे, आचार्य यांचे शाळांमधून कार्यक्रम घडवून आणावेत. वर्तमानाकाळात साजेशा अशा परिस्थितीत आपल्याला धर्मसंप्रदायातील कर्मकांड आणि विधीनिषेदाची समाजाला दिक्षा देऊन त्याला अध्यात्मिकदृष्टया वर उठवावे. सर्व क्षेत्राच्या विकासासाठी वानप्रस्थीची गरज आहे. त्यासाठी वानप्रस्थाचे पुनर्जीवन घडवावे लागेल. चातुर्वर्ण्य व्यवस्था सुस्थीत करणे आणि भारतीय समाजात तीच्या धारणा कळविणे हे धर्मसंसद स्पष्ट करते.

## निष्कर्ष आणि समारोप

अलिकडील काळांत जागतिक राजकारणाचे संदर्भ बदलत चाललेले आहेत. जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था यामुळे राष्ट्रातील संबंधात गुणात्मक फरक पडत चाललेला आहे. प्रदेश आणि धर्म किंवा संस्कृतीवर आधारीत असलेला राष्ट्रवाद जागतिककरणाने आणि भांडवलशाहीने निर्माण केलेल्या वैश्विक संस्कृतीपुढे टिकाव धरू शकेल असी आज परिस्थिती राहिलेली नाही. स्पर्धेवर आधारीत असी खुली अर्थव्यवस्था भौतिक समृध्दी वाढवीत आहे. परंतु स्पर्धा हेच माणसाचे जीवन मुल्य ठरू पाहत आहे आणि ही सर्वव्यापी प्रक्रिया होवू पाहत आहे. या स्पर्धात्मक वातावरणांत सामान्य, दुबळा माणूस टिकू शकणार नाही. सामान्य माणसाचा बहूसंख्याचा गट हा समृध्दीचा वर्तुळाबाहेर फेकला गेला आहे. स्पर्धेवर आधारलेला हा संस्कृतीवाद माणसाला अधःपतीत करत असतो. मानवी विकासक्रमाचा इतिहास आपणांस हेच सांगतो. आजच्या भांडवलशाहीचे रूप अत्यंत व्यापक व जगाला कवेत घेणारे असल्याने जुन्या संस्कृतीचा अंत होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. माणूस हा आधिक आत्मकेंद्रीत झालेला असून चगंळवाद, सुख ही त्यांची जीवनमुळे होत

चाललेली आहेत. एकीकडे धर्म, जात-पात, संप्रदाय इ. च्या बंदीस्त भिंती कोसळत असतानाच वर्गीय व्यवस्था आधिक उग्रस्वरूपांत विकसीत होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. मानवी नातेसंबंध आणि त्याच्या आजपर्यंतच्या नितीमत्तेच्या संकल्पना बदलत चाललेल्या आहेत. अशा एका अवघडलेल्या अवस्थेत मानव नावांचा प्राणी गुरफटलेला आहे.

प्रत्येक देशाच्या राजकारणाचे मुल्यविरहीत स्वरूप मानवाच्या चिंतेच्या आणि चितंनाचा विषय ठरू पाहत आहे. कुटनिती, धनसत्तेचा वापर इ. बाबीना सामाजिक प्रतिष्ठा मिळत आहे. त्यामुळे अनिती, कपटकारस्थान, साधनाची अशुचिता इ. वापर राजकारणांत होत आहे. या मार्गाबद्यल तरूणाईच्या मनांत तिरस्कृततेची भावना निर्माण होण्याऐवजी, त्या संबंधी कौतुकमिश्रीत जिज्ञासेने पाहिले जाते आहे. असी परिस्थिती जगांत सर्वत्रच अढळते असे नाही. परंतु या परिस्थितीची व्यापकता चिंता करण्यासारखी आहे.

नव्या जगात माणसे स्पर्धेने बेभान होवून आपले माणूसपण गमावणार की, परस्पर सहकार्याचा हात पुढे करून माणसाला उत्क्रांतीच्या पुढच्या टप्पावर नेणार असा हा क्रम आहे. भांडवलशाहीने माणसाला स्वातंत्र्य बहाल केले. भांडवलशाहीचे योगदान म्हणजे माणसाला स्वतंत्र व्यक्तीमत्व निर्माण परिस्थिती निर्माण केली. किंबहूना सरंजामशाही राजकीय व्यवस्थेतून लोकशाही अवस्थेकडे राज्यसंस्थेचा गतीशील प्रवास भांडवलशाहीमुळे सुकर होवू शकला. मानवी विकासक्रमांत भांडवलशाही अर्थव्यवस्था ही काही शेवटची अर्थव्यवस्था नव्हे. मानवी जीवनाच्या आदिम काळापासून अर्थव्यवस्थेने अनेक रूपे धारण केलेली आहेत. मानवी विकासक्रमाच्या प्रत्येक टप्यावर विकसीत होत गेलेली नवीन अर्थव्यवस्था कालातंराने काळबाहय होवून त्या जागी नव्या अर्थव्यवस्थेने जगा स्विकारली आहे.

भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा प्रवास अनेक अडथळे पार करीत चाललेला आहे. भारतीय धर्मनिरपेक्षतेला अनेक आव्हानाना सामोरे जावे लागत आहे. कधी हिंदूराष्ट्रवादाचे उग्र आव्हान, तर कधी सिमी, जमात - ए- इस्लामी सारख्या कडव्या मुलतत्ववादी संघटनाचे जिहादी आव्हान अशा विविध आव्हानाना सामोरे जात असताना भारतीय लोकशाहीची दमछाक होते आहे. या परिस्थितीचा वेगळया संदर्भात विचार करून काही जणांनी Benevolent Dictatorship चा स्विकार केला जावा अशी सुचना मांडली तर काहीच्या मते राज्यघटनेचे नवीनीकरण केले जावे म्हणून अनअधिकृत घटनाबाहय समित्याची नेमणूक केली. या सर्वच प्रश्नाबाबत विचार होत असताना त्याबाबत नेमकी कोणती उपाय योजना स्विकारावी असा भ्रम निर्माण होतो.

### संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १ | V. D. Savarkar | Hindu Rashtra Darshan L.G. Khare Bombay १९४९ पृ. ५८ |
| २ | H.V. Sheshadri | R.S.S. A vision in Action Jagran Prakashan Banglore १९८८ |
| ३ | Shastri Shripati | A Retrospect, Christanity in India (Bhartiya Vichar Sadhana Pune |
| ४ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. ९८ |
| ५ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. ९५ |
| ६ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. ९६ |
| ७ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. १०२ |
| ८ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. १६ |
| ९ | Balraj, Madhok | Indianisation S. Chand & co. New Delhi १९७० Page No. १८ |
| १० | Bhartiya Janta Party | (Expending Horizons) B.J.P. First Decade १९९० |